# REPORT OF SOLAR POWERED MOTORIZED TRICYCLE, COMPOSITE REGIONAL CENTRE, NAGPUR

## OBJECTIVES: -

- The living standards and economic well-being of the persons with disabilities will increase.
- Through this initiative, the concept of an inclusive society will be created.
- To provide equal opportunity to persons with disabilities to stand on their own feet in every field (by moving to remote areas and working to the best of their ability), thereby increasing their educational level and livelihood, creating new employment and improving living standards and strengthening economic development.
- To give them a special place in the society.

## FEATURES OF SOLAR POWERED TRICYCLES:-

- Fully charged on solar in < 5hrs
- BMS protected
- 40 kms of mileage on plain road
- Max. Speed of 23 km per hour
- Robust and compact design
- Battery level indicator
- Electric brake control system
- Adjustable handle
- Electric charging also possible
- Comes with power charging cable



## **DISTRIBUTION CAMP OF SOLAR POWERED TRICYCLES FOR PERSONS WITH DISABILITIES**

With initiative and courtesy of Hon'ble Shri.Nitin Ji Gadkari, Minister to Road Transport and Highways, Govt. of India, was distributed to Persons with disabilities. Composite Regional Centre for Skill Development, Rehabilitation and Empowerment of Persons with disabilities, Nagpur (CRC Nagpur) in collaboration with Andhra Pradesh Med Tech Zone (AMTZ) at Visakhapatnam was providing Solar Powered Motorized Tricycles for the first time in Nagpur city on 24.02.2024.










केंद्रीय मंत्री श्री. नितिनजी गडकरी, यांचे सौजन्याने,
नागपुरातील गरजू दिव्यांगांना
सौर उर्जा चलित मोटराईज्ड ट्रायसिकल
वितरण सोहळा
शनिवार दि २४ फेब्रुवारी २०२४ रोजी
सकाळी १० वाजता
स्थळ - एन्क्रिको हाईट्स, वर्धा रोड, नागपूर
वितरण - मा. श्री. नितीनजी गडकरी
केंद्रीय मंत्री, भारत सरकार यांचे शुभहस्ते
लोकहितं मम करणीयम्!!
सुविधा
बॅटरी पातळी निर्देशक
इलेक्ट्रिक ब्रेक कंट्रोल सिस्टम
समायोजित (Adjustable) करण्यायोग्य हँडल
इलेक्ट्रिक चार्जिंग व सोलर सिस्टिम
पॉवर चार्जिंग केबल सह
कौशल्य विकास, पुनर्वास एवं दिव्यांगजन सशक्तिकरण केन्द्र, नागपू







LOKMAT TIMES

# Solar powered motorised tricycles presented to 35 Divyangs

**Lokmat News Network**
NAGPUR



Union minister Nitin Gadkari distributing tricycles to the Divyangs.

Materials worth ₹40 crore were given to the disabled earlier. Today, 35 disabled persons were given motorised tricycles powered by solar energy from the MP fund. Union Minister Nitin Gadkari on Saturday asserted that he is committed to make the life of every disabled person in Nagpur city bearable.

The programme was jointly organised by the Integrated Regional Skill Development, Rehabilitation and Disability Empowerment Center (CRC) and Andhra Pradesh Made Tech Zone, Vishakhapatanam at Enrico Heights.

MLA Mohan Mate, MLA Vikas Kumbhare, MLC Pravin Datke, BJP city president Bunty Kukde, former MLA Dr Milind Mane, Jaiprakash Gupta, district collector Dr Vipin Itankar, CEO of ZP Saumya Sharma were prominently present.

Gadkari also said that efforts are on to distribute these tricycles on a large scale in the coming time.

The maximum speed of this vehicle which gets completely charged on solar energy in 5 hours, is upto 23 km per hour. This vehicle can go upto a distance of 40 km in single charge. The motorized tricycle incorporates an electric brake control system.

Nagpur First
Page No. 2 Feb 25, 2024
Powered by: erelego.com

तरुण भारत
Apla Nagpur | 2024-02-25 | Page- 3
epaper.tarunbharat.net

# दिव्यांगांचे जीवन सुसह्य झालेच पाहिजे

**• केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे प्रतिपादन • सौरऊर्जाचलित मोटराईज्ड ट्रायसिकलचे वितरण**



◆ नागपूर, २४ फेब्रुवारी

दिव्यांग हेही समाजाचे प्रमुख घटक आहेत. त्यांच्याही जीवनात सुखाचे क्षण कायम राहायला हवेत. अगदी हीच भूमिका घेत आपण यापूर्वी आम्ही दिव्यांगांना ४० कोटी रुपयांचे साहित्य दिले होते. आज खासदार निधीतून ३५ दिव्यांगांना आम्ही सौर ऊर्जेवर चालणाऱ्या मोटराईज्ड ट्रायसिकल दिल्या. नागपूर शहरातील प्रत्येक दिव्यांगाचे जीवन सुसह्य करण्यासाठी मी कटिबद्ध आहे. त्यादृष्टीनेच या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केले. शनिवार २४ फेब्रुवारी २०२४ रोजी त्यांनी दिव्यांगांना ट्रायसिकलचे वाटप केले यावेळी त्यांनी भूमिका मांडली.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून, समेकित क्षेत्रीय कौशल्य विकास, पुनर्वसन आणि दिव्यांग सशक्तीकरण केंद्र (सी.आर.सी.) यांच्या वतीने आणि विशाखापट्टणम येथील आंध्रप्रदेश मेड टेक झोन (एएमटीझेड) यांच्या विशेष सहकार्याने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी आमदार मोहन मते, आमदार विकास कुंभारे, आमदार प्रवीण दटके, भाजपचे शहराध्यक्ष बंटी कुकडे, माजी आमदार डॉ. मिलिंद माने, जयप्रकाश गुप्ता, जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौम्या शर्मा, श्रीकांत आगलावे, डॉ. गिरीश चरडे, डॉ. श्रीरंग वराडपांडे उपस्थित होते.

यावेळी एएमटीझेडचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. जितेंद्र शर्मा, रवी शर्मा, एन. नरेश कुमार, के. लेंका, तर सीआरसीचे संचालक प्रफुल्ल शिंदे, माधुरी कांबळे, व्यंकटेश बेलखोडे, रोहिणी, डॉ. विंकी रुघवानी, डॉ. प्रीती मनमोडे उपस्थित होते. ◄ *(तभा वृत्तसेवा)*

### अशी आहे मोटराईज्ड ट्रायसिकल

सौरऊर्जेवर ५ तासांमध्ये पूर्णपणे चार्ज होणाऱ्या या वाहनाचा वेग ताशी २३ किलोमीटरपर्यंत आहे. याशिवाय ४० किलोमीटरचा कमाल मायलेज देण्याची क्षमता यामध्ये आहे. अतिशय मजबूत रचना आणि संक्षिप्त स्वरूपातील मोटराईज्ड ट्रायसिकलमध्ये इलेक्ट्रिक ब्रेक कंट्रोल सिस्टीमदेखील समाविष्ट करण्यात आली आहे. विशेष म्हणजे या वाहनाचे इलेक्ट्रिक चार्जिंगदेखील शक्य आहे. त्यादृष्टीने एक पॉवर केबल त्यासोबत देण्यात आला आहे.

Powered by iDocuments

पुण्य नगरी

# ३५ दिव्यांगांना सौरऊर्जाचलित मोटराइज्ड ट्रायसिकलचे वितरण

**पुण्य नगरी** / प्रतिनिधी



**नागपूर :** शहरातील प्रत्येक दिव्यांगांचे जीवन सुसह्य करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज (ता. २४) केले. खासदार निधीतून ३५ दिव्यांगांना सौरऊर्जेवर चालणाऱ्या मोटराइज्ड ट्रायसिकल वितरण कार्यक्रमात ते बोलत होते.

गडकरी यांच्या संकल्पनेतून, समेकित क्षेत्रीय कौशल्य विकास, पुनर्वसन आणि दिव्यांग सशक्तीकरण केंद्र यांच्या वतीने आणि विशाखापट्टणम येथील आंध्रप्रदेश मेड टेक झोन (एएमटीझेड) यांच्या विशेष सहकार्याने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

वर्धा मार्गावरील गडकरी यांच्या निवासस्थानी पार पडलेल्या या कार्यक्रमाला आ. मोहन मते, आ. विकास कुंभारे, आ. प्रवीण दटके, भाजपा शहराध्यक्ष बंटी कुकडे, माजी आमदार डॉ. मिलिंद माने, जयप्रकाश गुप्ता, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौम्या शर्मा, एएमटीझेडचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. जितेंद्र शर्मा, रवी शर्मा, एन. नरेश कुमार, के. लेंका, सीआरसीचे संचालक प्रफुल्ल शिंदे, माधुरी कांबळे, व्यंकटेश बेलखोडे, डॉ. विंकी रुघवानी, डॉ. प्रीती मानमोडे यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन डॉ. श्रीरंग वराडपांडे यांनी केले.

Smart Nagpur Edition
Feb 25, 2024 Page No. 04
Powered by: erelego.com

**DISTRIBUTION CAMP OF SOLAR POWERED MOTORIZED TRICYCLE FOR PERSONS WITH DISABILITIES ON 16.03.2024**

With initiative and courtesy of Hon'ble Shri.Nitin Ji Gadkari, Minister to Road Transport and Highways, Govt. of India, 20 Tricycles was distributed to Persons with disabilities. Composite Regional Centre for Skill Development, Rehabilitation and Empowerment of Persons with disabilities, Nagpur (CRC Nagpur) in collaboration with Andhra Pradesh Med Tech Zone (AMTZ) at Visakhapatnam was providing Solar Powered Motorized Tricycles at Nagpur city on 16.03.2024.







# नितीन गडकरी : सौरऊर्जाचलित मोटराइज्ड ट्रायसिकलचे वितरण

# दिव्यांगांच्या चेहऱ्यावरील आनंद हीच माझी मिळकत

**नागपूर**– नागपूरसह संपूर्ण विदर्भात कुणालाही शारीरिक व्यंग आहे म्हणून उदरनिर्वाह चालविण्यास अडचण निर्माण होऊ नये, त्यांना जीवन जगताना अडचणींचा सामना करावा लागू नये, असा माझा प्रयत्न आहे. त्याच उद्देशाने कृत्रिम अवयव लावून देणे, ट्रायसिकलचे देणे हे कार्य सुरू आहे. दिव्यांगांच्या चेहऱ्यावरील आनंद हीच माझी मोठी मिळकत आहे, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री ना. श्री. नितीन गडकरी यांनी आज (शनिवार) केले.

केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून, समेकित क्षेत्रीय कौशल्य विकास, पुनर्वसन आणि दिव्यांग सशक्तीकरण केंद्र (सी.आर.सी.) यांच्या वतीने आणि विशाखापट्टणम येथील आंध्रप्रदेश मेड टेक झोन (एएमटीझेड) यांच्या विशेष सहकार्याने नागपुरातील



दिव्यांगांना सौरऊर्जाचलित मोटराइज्ड ट्रायसिकलचे वितरण करण्यात आले. मंत्री महोदयांच्या निवासस्थानी शनिवारी (दि. १६ मार्च) सकाळी ११ वाजता हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. ना. श्री. गडकरी म्हणाले, 'शिक्षण, आरोग्य, शेतकरी, गरीब यांची सेवा करण्यात मला आनंद मिळतो आणि माझ्यासाठी तेच खरे राजकारण आहे. ट्रायसिकल मिळाल्यानंतर दिव्यांगांना रोजगारासाठी मोठे साधन उपलब्ध झाले आहे. त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद कमालीचे समाधान देणारे आहे.